# न्याहळोद येथील समूह आद्य रेखा पीक प्रात्यक्षिक तूर अंतर्गत तुर पिकाचा प्रक्षेत्र दिन साजरा

धुळे येथील कृषी विज्ञान केंद्रा मार्फत समूह आद्य रेखा पीक प्रात्यक्षिक कडधान्य अंतर्गत तुर पिकाच्या फुले तृप्ती या वाणाचे एकूण 250 प्रात्यक्षिके देण्यात आले होते. त्या अंतर्गत शेतकरी बांधवांना तूर पिकाच्या नवीन संशोधित वाण फुले तृप्ती या वाणाची ओळख व्हावी. तिचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने प्रक्षेत्र दिन साजरा करण्यात आला. या प्रक्षेत्र दिनाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बबनराव ईल्हे, सहयोगी अधिष्ठाता कृषी महाविद्यालय धुळे उपस्थित होते.

कृषी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव ईल्हे यांनी प्रक्षेत्र दिनाविषयी महत्व पटवून तूर पिकाच्या नवीन नवीन वानांचा उत्पादन वाढीसाठी वापर करून त्याचा प्रचार व प्रसार करण्यात शेतकऱ्यांनी मोलाची भूमिका बजवावी असे आव्हान केले.

कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. दिनेश नांद्रे यांनी विद्यापीठाच्या नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून अधिक उत्पन्न मिळवण्याची कास धरावी असे आव्हान केले. यावेळी तूर पिकाच्या फुले तृप्ती या वाणा विषयी कृषी विद्या शास्त्रज्ञ जगदीश काथेपुरी म्हणाले की बाजारामध्ये कडधान्य पिकाचे मोठ्या प्रमाणावर वधारलेले आहेत. कडधान्य उत्पादन वाढल्याने याचा फायदा मोठ्या प्रमाणात होणार आहे. अन्य वानाच्या तुलनेत फुले तृप्ती या वाणाचे उत्पादन अधिक असून बाजारामध्ये या वाणाला चांगली मागणी आहे यासोबत अधिक उत्पादनासाठी तुर पिकाच्या उत्पादन वाढीचे तांत्रिक सूत्रे विशद करण्यात आली.

पीक संरक्षण शास्त्रज्ञ म्हणाले की दूर पीक लागवड करण्यापूर्वी ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची बीज प्रक्रिया केल्यास मर रोगाचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. तसेच कीड व रोग नियंत्रणासाठी जैविक कीटकनाशकांचा वापर  करावा असे आवाहन केले. याप्रसंगी न्याहळोद येथील श्री. विजय जाधव, ॲड. राजपूत प्रगतशील शेतकरी  गोटू वाणी व  न्याहळोद येथील समूह आद्य रेखा पीक प्रत्यक्षकातील लाभार्थी तसेच पंच कोशीतील शेतकरी उपस्थित होते. सूत्र संचालन श्री जगदीश काथेपुरी यांनी केले. व आभार प्रदर्शन श्री जीवन राणे यांनी मानले.